# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १०५-२३** **दिनांक :- ०३/०४/२०२३**

## महागडया कारमधील टेप चोरी करणा-या आरोपीतांस अटक

## गुन्हे शाखा कक्ष-3, विरार यांची कामगिरी.

फिर्यादी नामे श्री. सौमील संदीप मनकीकर, रा. विरार (प) ता. वसई जि. पालघर यांनी दिनांक २४/०३/२०२३ रोजी रात्रौ १२.३० वाजेचे सुमारास त्यांची मारुती सुझुकी कंपनीची वॅगनॉर कार क्रं. एम.एच.०१, ए.आर. ४१७५ ही राहत्या घराचे परिसरात पार्क केली होती. सकाळी ०९.५२ वाजेच्या सुमारास पर्किग केलेल्या कार जवळ गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने सदर कारच्या डाव्या बाजुची समोरच्या सीटजवळील काच फोडुन नुकसान करुन गाडीमधील एल.ई.डी म्युझिक सिस्टीम चोरल्याचे फिर्यादी यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ३१२/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३७९,४२७ अन्वये दिनांक २४/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यापासुन महागडया कारची काच फोडुन कारमधील म्युझिक सिस्टीम / टेप चोरी केलेबाबत पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले होतो.

सदर दाखल गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठांनी गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांच्याकडे सोपविला होता. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३, विरार चे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे महिला आरोपीत नामे १) अंजु मुकेश वधानी, २) सरीता गणेश लिंगम दोन्ही रा. बिलालपाडा रोड, पाटील नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक ३०/०३/२०२३ रोजी १५.३० वाजता ताब्यात घेवुन तपास केला असता वर नमुद महिला आरोपीत यांनी वर नमुद गुन्हा हा विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे मदतीने केले असल्याची निष्पन्न झाले. नमुद अटक महिला अरोपीत यांचेकडुन गुन्हा करणेकरीता वापरण्यात आलेली ॲक्टीवा मोटार सायकल व चोरी केलेले ६ म्युझिक सिस्टीम / कारटेप असा एकुण ०१,०६,५५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन खालील ६ गुन्हे उघडकीस आले आहेत.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे | ३१२/२०२३, | भा.द.वि.सं. कलम ३७९,४२७ अन्वये |
| २. | विरार पोलीस ठाणे | ३१३/२०२३, | भा.द.वि.सं. कलम ३७९,४२७ अन्वये |
| ३. | विरार पोलीस ठाणे | ३१४/२०२३, | भा.द.वि.सं. कलम ३७९,४२७ अन्वये |
| ४. | विरार पोलीस ठाणे | १४०/२०२३, | भा.द.वि.सं. कलम ३७९,४२७ अन्वये |
| ५. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ११६/२०२३ | भा.द.वि.सं. कलम ३७९,४२७ अन्वये |
| ६. | तुळींज पोलीस ठाणे | १०७/२०२३ | भा.द.वि.सं. कलम ३७९,४२७ अन्वये |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव, कविता पांढरे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३, विरार तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेम सायबर सेल यांनी केली आहे.



-----oooo----